Reading Passages

# नाटक

राहुलला नाटक बघायला आणि त्यात काम करायला आवडते. एका नाटकात तो पोस्टमन झाला होता. स्टेजवर येऊन पोस्टमन म्हणून ओरडायचे, पत्र हातात देऊन त्यांची सही घ्यायची असे त्याचे काम होते. तो स्टेजवर आला, पण पत्र आणायलाच विसरला. सगळे लोक हसले, तोही लाजला. मग त्याने परत आत जाऊन पत्र आणले आणि सही घेतली. त्यानंतर मात्र त्याने नाटकात खूप कामे केली. एकदा तो कृष्ण झाला होता तर एकदा शाळेतला शिक्षक. माणसांप्रमाणे त्याने प्राणी, पक्षी, राक्षस, भुते अशीही कामे केली. त्याला गंमतीदार नाटके फार आवडतात. त्याचे नाटक बघायला त्याचे आई आणि बाबा येतात. नाटक संपल्यावर त्याला चांगल्या कामाबद्दल शाबासकी देतात.

प्रश्न:

१. राहुलला पहिल्या नाटकात काय काम होते?
२. राहुलला पहिल्या नाटकात लोक का हसले?
३. राहुलने नाटकात कोणकोणती कामे केली?
४. राहुलला कोणती नाटके जास्त आवडतात?
५. राहुलने त्याच्या आई आणि बाबांविषयी काय सांगितले?

Reading Passages

**कुत्र्याचे पिल्लू**

अनुजाला शाळेतून परत येताना एका खांबावर एक कागद चिकटवलेला दिसला. त्यात लिहिले होते "माझे छोटेसे कुत्र्याचे पिल्लू हरवले आहे" – मेगन. पिल्लू सापडले तर मेगनच्या घरी कळवा असेही लिहिले होते. अनुजा रस्त्यावरून पुढे घराकडे निघाली. खूप कडक ऊन पडले होते. तेवढ्यात अनुजाला रस्त्याच्या कडेला एक लहानसे कुत्र्याचे पिल्लू दिसले. उन्हामुळे ते थकले होते. अनुजाने त्याला हातात उचलून घेतले, तिच्याजवळ पाण्याची बाटली होती. त्या बाटलीतले थोडे पाणी हातात घेऊन तिने त्याला पाजले. मग त्याला थोडी हुशारी आली आणि ते तिचा हात चाटू लागले. ती त्याला घेऊन घरी आली. तिने आईला ते पिल्लू आणि कागद दाखवला. मग आईने मेगनच्या घरी फोन करून एक कुत्र्याचे पिल्लू सापडले आहे असे कळवले.

प्रश्न:

१. कागदावर काय लिहिले होते?
२. कुत्र्याचे पिल्लू कुठे दिसले आणि ते कसे होते?
३. अनुजाने पिल्लाला पाणी कसे दिले?
४. पाणी प्यायल्यावर पिल्लू काय करू लागले?
५. पिल्लाला घरी आणल्यावर आईने काय केले?

Listening Passages

## लेगो

अर्जुनला सकाळी लवकर उठायचा कंटाळा येतो. पण हे अर्जुनच्या आईला अजिबात आवडत नाही. ती जोराजोरात हाका मारून त्याला उठवते. मग तो कंटाळून उठतो. पण आज रविवार असूनही तो लवकर उठला कारण त्याची मावशी आज अमेरिकेहून येणार होती. ती त्याच्यासाठी गंमत आणणार होती. थोड्या वेळाने मावशी आली. जेवण, गप्पा गोष्टी झाल्यावर मावशीने आपली बॅग उघडली आणि दोन डबे काढले. एका डब्यामध्ये अर्जुनची आवडती चॉकोलेटे होती आणि दुसऱ्या डब्यामध्ये रंगीबेरंगी ठोकळ्यांचा 'लेगो' (LEGO) हा खेळ होता. अर्जुनने लेगोचे निळ्या, हिरव्या, पिवळ्या, केशरी, लाल, काळ्या आणि पांढऱ्या रंगांचे ठोकळे काळजीपूर्वक बाहेर काढले. हे ठोकळे एकमेकांत बसवून बिल्डिंग, घर, गाडी, आगगाडी, विमान असे वेगवेगळे आकार तयार करता येतात. मावशीने सांगितले की अमेरिकेत तर लेगोचे पार्क देखील आहे. तिथे हे ठोकळे वापरून शहराचा देखावा तयार केला आहे. अर्जुनला लेगो इतका आवडला की तो चॉकोलेट खायचे विसरून गेला.

प्रश्न:

१. अर्जुन सकाळी लवकर का उठला?
२. अर्जुनच्या मावशीने कोणत्या गंमती आणल्या?
३. लेगो हा खेळ कसा असतो?
४. लेगो या खेळात काय काय बनवता येते?
५. अमेरिकेत पार्कमध्ये लेगो वापरून काय बनवले आहे?

Listening Passages

## खिसमस ट्री

वरती निमुळते, टोकदार आणि खाली सुंदर फ्रॉकसारखा घेर असलेले झाड ख्रिसमसच्या दिवशी घराघरात दिसते. हिरव्यागार फांद्या आणि त्यावर केलेली सजावट असे त्याचे देखणे रूप असते. हे झाड म्हणजे ख्रिसमस ट्री, कधी टेबलावर ठेवण्याइतके छोटे तर कधी अंगणात ठेवता येईल इतके मोठे असते. हिवाळ्यातल्या बर्फातसुद्धा नेहमी हिरवे राहणारे असे हे झाड. याची पाने नेहमी ताजी राहतात आणि या झाडांची कोणत्याच ऋतूमध्ये पानगळ होत नाही. २५ डिसेंबर हा येशू ख्रिस्ताचा जन्मदिन ख्रिसमस म्हणून साजरा करतात. रंगीबेरंगी अलंकार, चांदण्या, खेळणी, लखलखणारे दिवे, कागदाची फुले अशा सजावटीच्या अनेक वस्तुंनी हिरव्यागार ख्रिसमस ट्रीला सजवतात. झाडाच्या टोकाला सर्वात वरती तारा लावला जातो. कधी कधी त्यावर चॉकोलेटस् आणि कँडीज् लटकवतात. ख्रिसमस ट्रीच्या खाली खेळण्यातील आगगाडी आणि अवतीभवती भेटवस्तू मांडतात. हे झाड छान सजवले की सँटाक्लॉज खूष होईल आणि आपल्याला भेटवस्तू देईल असे लहान मुलांना वाटते. सजवलेल्या झाडामुळे घरात उत्साही आनंदी वातावरण तयार होते. म्हणूनच केवळ ख्रिश्चनच नव्हे तर इतर घरातूनही ख्रिसमस ट्री सजवले जाते.

प्रश्न:

१. ख्रिसमस ट्रीचा आकार कसा असतो?
२. या झाडात काय विशेष आहे?
३. ख्रिसमस ट्री सजवण्यासाठी काय वापरतात?
४. लहान मुले ख्रिसमस ट्री का सजवतात?
५. ख्रिश्चन लोकांप्रमाणे इतर लोक पण ख्रिसमस ट्री का सजवतात?

`